## प्रकरण तिसरे

## बोरकरांची " भावीण " देवदासींची प्रतिनिधी

## प्रकरण तिसरे

## बोरकरांची ' भावीण ' : देवदासींची प्रतिनिधी

बा. भ. बोरकर : जीवन व साहित्य

गोमंतकीय रूणझुणणा-या वातावरणात नादमधुर, भावगर्भ, कविता लिहिणारे कवी बा. भ. बोरकर साहित्याच्या प्रवासातील एक ' आनंदयात्री ' च होते. कवी म्हणून अवघा महाराष्ट्र बोरकारांना ओळखतो. मात्र मराठी साहित्य शारदेच्या दरबारातील या सौंदर्यासक्त सेवकाने नितळ कवितेप्रमाणे गद्य लेखनाची सेवाही अर्पण केली आहे. ललितलेख, कथा, कादंबरी आणि इतर बरेच संकीर्ण लेखन करून आपले स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व त्यांनी सिद्ध केले.साहित्याच्या सर्व प्रांतात मुक्त हस्ताने लेखन करणा-या या साहित्यिकाची वैविध्यपूर्णतेने नटलेली चाळीसवर पुस्तके आहेत. मात्र महाराष्ट्र त्यांना ' कवी बोरकर ' म्हणूनच ओळखतो.

मराठीच्या काव्यक्षितिजावर चमकणारा हा तारा 1934 मध्ये बडोदे येथील साहित्य संमेलनात सुवर्ण पदक मिळवून ख-या अर्थाने रसिकमान्य झाला. 30 नोव्हेंबर 1910 ला गोव्यातील कुडचडे येथे जन्मलेल्या बोरकरांचे निसर्गसौंदर्याने नटलेले बोरी हे गाव. निसर्गाचे अपरिमित सौंदर्य लाभलेले बोरी हे गोव्यातीलच एक छोटे गाव. गावाच्या अवतीभवती सर्वदूर पसरलेली विस्तीर्ण खाचरे, सभोवती नारळी - पोफळीच्या झावळे ढाळत उभ्या असलेल्या असंख्य बागा, सदासतेज वनश्रीने नटलेला हिरवागार भव्य डोंगर, मनाला भुरळ पाडत फेसाळ दूधलाटा उधळणारी खाडी घेऊन पसरलेल्या या गावाच्या परिसरात सदोदित वैभवशाली उत्सवाने गजबजून गेलेली अनेक देवालयेही दिसतात. अशा या परिसारात ओसंडून वाहणा-या अमाप सृष्टीसौंदर्यात बोरकर स्वच्छंद संपन्नतेत वाढत होते.

निसर्गाची संपन्नता लाभलेल्या या गावात असलेले बोरकरांचे घरदेखील आर्थिकदृष्टया संपन्न होते. मात्र या गावात शिक्षणाची सोय नव्हती त्यामुळे बोरकरांचे मराठी दुसरीपर्यंतच येथे शिक्षण झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना आपले बोरी हे गाव सोडावे लागले.

धारवाड येथील सरकारी हायस्कूल मधून 1928 मध्ये त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली. 1929 ला शिक्षण बंद करून नोकरी मिळविण्यासाठी म्हणून त्यांनी मुंबई गाठली पण निसर्ग सौंदर्यात रमलेल्या बोरकारांना मुंबई मानवणार नाही, याची कल्पना आली म्हणून ते पुन्हा गोव्याला परतले. वास्को येथे

1930 मध्ये त्यांनी शिक्षकांची नोकरी पत्करली. याचवर्षी मडगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात बोरकरांचा ' प्रतिभा ' हा पहिला कविता संग्रह प्रसिद्ध झाला. वि. स. खांडेकरांच्या प्रस्तावनेसह 1937 मध्ये प्रसिद्ध झालेल्या ' जीवन संगीत ' ने त्यांना मराठीतील अनेक रसिक मान्यवरांची मान्यता लाभली.

काव्यक्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करीत असताना बोरकरांनी लघुनिबंध, कादंबरी, कथा, अनुवाद व इतर काही संकीर्ण लिखाणाकडेही आपले लक्ष वळवले होते. याचे निदर्शक म्हणजे 1938 साली प्रसिद्ध झालेला ' कागदी होड्या ' हा लघुनिबंध संग्रह आणि ' मावळता चंद्र ' ही कादंबरी. पुढे 1943 ला ' अंधारातली वाट ' ही त्यांची दुसरी कादंबरीही प्रसिद्ध झाली.

पुढे गोवा मुक्ती लढयात अनपेक्षितपणेच बोरकरांनी स्वतःला झोकून दिले. गोवा स्वातंत्र्य संग्रामासाठी लढताना त्यांना स्वतःची सरकारी नोकरी आणि 1946 ते 1948 च्या दरम्यान मुंबईही सोडावी लागली मात्र याच दरम्यान बोरकरांचे काव्यक्षेत्रातील श्रेष्ठत्व सिद्ध करणारा ' दूधसागर ' हा कविता संग्रह 1947 ला प्रसिद्ध झाला आणि या पाठोपाठ 1950 ला ' आनंद भैरवी ' हा कविता संग्रह, ' भावीण ' ही कादंबरी, बापूजींची ओझरती दर्शने, आम्ही पाहिलेले गांधीजी ही अनुवादित पुस्तके एवढे लेखन प्रसिद्ध झाले. या दरम्यानचा काळ हा बोरकरांच्या व्यक्तिमत्वात विलक्षण बदल घडवून आणणारा होता. कुटुंब, गाव, प्रदेश यांच्या संस्काराने बोरकरांचे काव्यात्म व्यक्तिमत्व घडत होते. पण 1930 च्या दरम्यान ते आकारत गेले. या काळात म. गांधींच्या कार्याचा फार मोठा प्रभाव बोरकरांवर पडला. त्यांच्या मनात राष्ट्रभक्तीचा अंकुर हळूहळू वाढत, विकसत गेला. आदर्शवाद आणि ध्येयवाद यांचा अंगीकार केलेले बोरकर गांधीवादी विचारसरणीने प्रभावित झाले होते, हे निश्चित.

1955 मध्ये आकाशवाणी पुणे केंद्रावर वाङ्मय संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली आणि एका वेगळयाच साहित्य आणि भावविश्वात ते रममाण झाले. अशा या साहित्यसेवी बोरकरांच्या साहित्यसेवेची कदर महाराष्ट्राने केली आहे. 1970 मध्ये त्यांच्या आयुष्याला साठ वर्षे झाली. यावेळी, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे अधिवेशन, महाबळेश्वर येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान, खार येथील मुंबई उपनगर साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. हा खरोखरच त्यांचा सन्मान होता. स्पर्धेच्या जगात न उतरता साहित्याची वाट चालणा-या या सुहृदाला राष्ट्रीय पातळीवरचे काही मानसन्मानही लाभले. 1967 मध्ये ' पद्मश्री ' हा राष्ट्रीय किताब त्यांना मिळाला तर त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याची पोच म्हणून सरकारने त्यांना ' ताम्रपट ' बहाल केला.

वयाच्या 14 व्या वर्षापासून काव्यलेखनास सुरवात केलेल्या बोरकरांनी एकूण 11 कविता संग्रह लिहिले आहेत तर त्याच्याच कवितांचे संपादित संकलन चार पुस्तकातून प्रसिद्ध झाले आहे. ' कागदी होड्या ', ' घुमटावरील पारवे ', ' चांदण्यांचे कवडसे ', ' पावलापुरता प्रकाश ' हे त्यांचे चार ललित लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. प्रियदर्शिनी, समुद्रकाठची रात्र हे दोन कथासंग्रह तर ' आनंदयात्री रवींद्रनाथ ', ' महामानव रवींद्रनाथ ' ही दोन चरित्रात्मक पुस्तके शिवाय मावळता चंद्र, अंधारतली वाट, प्रियकामा, या त्यांच्या चार महत्वपूर्ण कादंब-या प्रसिद्ध झाल्या आहेत. शिवाय काही अनुवादित पुस्तके, रथयात्रा आणि कोंकणी काव्यसंग्रह हे दोन संपादित काव्यसंग्रह आणि कोंकणीतील नऊ पुस्तके प्रसिद्ध आहेत. बोरकरांनी लिहून ठेवलेली एवढी मोठी साहित्य संपदा आज उपलब्ध आहे. ती त्यांच्या आदर्श, ध्येयवादी, सामाजिक जीवनदृष्टीबरोबर सौंदर्यवादी प्रकृतीशी जवळीक ठेवणारी आहे.

## कादंबरी विश्वातील बोरकर

----------------

कवी म्हणून सर्वश्रुत असणारे बा. भ. बोरकर हे जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्यामुळेच गद्य लेखनाकडे वळले होते. आपल्या साहित्यिक वाटचालीत त्यांनी एकूण चार कादंब-या लिहिल्या आहेत. या चारही कादंब-या सर्वसामान्य माणसांच्या अंतःकरणाचा ठाव घेणा-या आहेत. पण त्या भावविवश आणि तितक्याच हळुवार उतरल्या आहेत कारण या कादंब-यांचा लेखक हा एक कवी आहे. त्यांच्या चारही कादंब-या कालानुक्रमे खालीलपमाणे आहेत.

### 1) मावळता चंद्र ( 1938 ) -

गोव्याच्या उठावदार वातावरणात शशांक, रजनी व दीयान या तिघांच्या भावसंबंधावर हे कथानक गुंफले आहे. शांत, सुशील पण आर्थिकदृष्टया बेताची परिस्थिती असलेल्या रजनीचा कलावंत - चित्रकार असणा-या शशांकशी विवाह होतो. तृप्त सुखाचे काही दिवस गेल्यानंतर त्या दोघात वैवाहिकदृष्टया एक प्रकारचा ताण निर्माण होतो. पुढे शशांक दिसायला मोहक व आव्हानात्मक असणा-या दीयानकडे आकर्षित होतो. मॉडेलसाठी शशांकने तिच्या काढलेल्या चित्राला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळतो. पण पुढे एखाद्या मावळल्या चंद्राप्रमाणे दीयान शशांकच्या आयुष्यातून निघून जाते. नवशिक्षित तरूणांच्या वास्तव समाजस्थितीचे प्रत्ययकारी दर्शन या कादंबरीतून घडले आहे.

2) अंधारातली वाट ( 1943 ) -

अनेक पात्रांचा वापर झालेली ही कादंबरी रहस्यपूर्ण गुंतागुंतीची आहे. विवाहपूर्व मिलनातून एखाद्या तरूणीवर ओढवलेले मातृत्व, बलात्कार, व्याभिचार, परिस्थितीच्या भोव-यात सापडल्यामुळे करावा लागलेला बळजबरीचा शृंगार याच्यातून तळातून हादरवून सोडणारी अनेक मानसिक आंदोलने आणि तणाव निर्माण होतात. विषम समाज रचनेमुळे विवाहाच्या बाबतीत अनेक पातळीवर प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांचे जणूकाही दिग्दर्शनच लेखकाला या कादंबरीतून करावयाचे आहे असे वाटते.

3) भावीण ( 1950 ) -

' भावीण ' ही गोमंतकातील एक प्रकारची देवदासी होय. धर्मविषयक रूढी, समजुती, देवदासीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण लक्षात घेऊन गोमंतकातील शेवंती भावीण आणि तिची आई फुलवंती यांची व्यक्तिरेखा केंद्रिभूत धरून बोरकरांनी पूर्णपणे सामाजिक पातळीवर कथानक रचले आहे. बोरकरांची ही एक महत्वपूर्ण कादंबरी आहे.

4) प्रियकामा ( 1983 ) -

पौराणिक विषयावरील बोरकरांची एक आगळीवेगळी कादंबरी म्हणूनच हिचा उल्लेख करावा लागेल. रामायणातील ' कैकयी ' ही या कादंबरीची नायिका आहे. सर्वसामान्य माणसांच्या मनात कैकयीची जी प्रतिमा आहे ती पूर्णपणे पुसून टाकून तिला या कादंबरीत आदर्श बनवण्याचा प्रयत्न केला आहे. कल्पनाशक्तीच्या जोरावर त्यांनी लिहिलेली ही कादंबरी सर्वसामान्य वाचकांत प्रिय झाली आहे.

बोरकरांनी आपल्या या कादंब-या वास्तव चित्रणातून सामाजिक पातळीवर लिहिल्या आहेत. प्रसंगानुरूप त्यांनी मनोविश्लेषणात्मक पद्धतीने लेखन केले आहे. त्यामुळे त्यांची कादंबरी रंजक झाल्याचे जाणवते. स्त्री-पुरूषांची नैसर्गिक कामप्रवृत्ती, त्यांच्यातील एकमेकांविषयीचे गूढ आकर्षण, त्यांचे नैतिक, अनैतिक, शारीरिक संबंध, कामप्रवृत्ती दाबून टाकल्याने मनावर येणारा विकृत ताण, मानसिक गुंतागुंत आणि तिच्या स्वैर वापरातून निर्माण होणारे अनेक सामाजिक प्रश्न या अंगानेच त्यांनी या कादंब-या लिहिलेल्या आहेत. या सर्व कादंब-यांत स्वतः बोरकर मात्र त्यांची ' भावीण ' ही कादंबरी यशस्वी मानतात. प्रा. कुसुमावतीबाईंनी त्यांच्या या कादंबरीचे कौतुक केले आहे. '[1]

× ' भावीण ' कादंबरीचे कथानक ×

---

गोमंतकीय शांतादुर्गेच्या देवळात सेवा करणारी शेवंती ही फुलवंती भाविणीची मुलगी. तिला केंद्रस्थनी ठेवून ' भावीण ' ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत रमाक्का व रवळूदादा त्यांचा मुलगा हृषी, विसुबाबांच्या कमली व रंजना या दोन मुली. ( यात पुन्हा रमाक्का व विसुबाबा हे बहीण भाऊ ) विसुबाबांचा जावई केशव हा कमलीचा नवरा. अशी तीन कुटुंबे व फुलवंती या भाविणीची शेवंती ही तरूण व लावण्यवती मुलगी. कलावंत सुवर्णकार अंताशेठ, गोव्यातील एक अधिकारी फ्रेड या सर्वांच्या संयोग-वियोगातूनच या कादंबरीची कथा उलगडत गेली आहे.

रवळूदादांचा मुलगा हृषी हा अत्यंत बुद्धिमान तरूण आहे. तो प्रोफेसरीच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. अशातच तो आपली नियोजित वधू रंजनेच्या घरी येतो. तेथे त्याला ओलेती रंजना दिसते. तिचे सौंदर्य पाहून त्याच्या मनात वासना-विकार उफाळून येतात. भावनावेगाने तो तिची पटापट चुंबने घेतो. अनपेक्षितपणे हृषीकडून झालेल्या या मर्यादेच्या उल्लंघनामुळे रंजना मनातून मोडून जाते. ती त्याला हवा तो प्रतिसाद देत नाही. तिच्याकडून झालेल्या या अपेक्षाभंगातून हृषीला विलक्षण धक्का बसतो. त्याचा मानभंग होतो.

पुढे देवीच्या पालखीच्या ठिकाणी हृषीला रंजनेची जणू काही प्रतिकृती असलेली शेवंती दिसते. या शेवंतीच्या सौंदर्यप्रतिमेतूनच अंताशेठीने शांतादुर्गेची काचोळी केलेली होती. काचोळीच्या पालखीच्या शेवटच्या पेण्याच्या वेळी शेवंती मूर्छित पडते. केशव तत्परतेने डॉक्टरची व्यवस्था करायला जातो. मात्र त्यावेळी हृषी इतर लोकांच्या बरोबर शेवंतीला पोचवण्यासाठी तिच्या घरी जातो. तिच्या असीम सौंदर्याच्या प्रभावामुळे पुन्हा त्याच्या हळव्या व भावूक मनात फारमोठी उलथापालथ होते. मग घरी कर्मठ वडील, परीक्षेचा ताण व मानसिक कोंडमारा यामुळे त्याच्या मनावर परिणाम होतो.

हृषीला या उमनस्क अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी स्त्री सुखाची गरज आहे. एखाद्या कुशल स्त्रीने हळुवार नाजूकपणे हे काम करणे गरजेचे आहे, असे डॉक्टर सांगतात. पण अशा कामासाठी कोणती स्त्री तयार होणार ? त्यातच अशा परिस्थितीत हृषीशी रंजनेचे लग्न करणे हे धर्मशास्त्र संमत नाही, असे विसुबाबा म्हणतात. अर्थात लग्न केल्याशिवाय वेड जात नाही व वेड गेल्याशिवाय लग्न होत नाही अशी विचित्र अवस्था निर्माण होते

मग हृषीचे शेवंतीशी अशा प्रकारचे विवाहबाह्य संबंध आणण्यात केशव पुढाकार घेतो. तो हृषीचे वडील, कर्मठ खळूदादांची समजूत घालतो. शेवंतीलाही सर्व पटवून देऊन तिच्या मनाची समजूत घालतो. यावेळी तो तिला तिच्या धर्माची जाणीव करून देतो. यावेळी भावीण धर्म पाळून केशवच्या विश्वासाला उतरण्याची शेवंती सिद्धता करते. कारण ती त्याचे उदात्त समाजकार्य पाहून भारावून जाऊन त्याच्यावर अनुरक्त झाली होती. म्हणूनच शेवंतीने फ्रेडकडून मिळणारी मदतही स्वीकारण्याचे बंद केले होते.

ध्येयवादी केशववरील निष्ठेमुळेच ती हृषीच्या सेवेत ' रत ' होते. त्याला कशाचीच उणीव भासू देत नाही. पुढे हृषीचे मानसिक संतुलन स्थिर होऊन तो बरा होतो पण त्याचे शेवंतीवर प्रेम बसते. तो तिच्याशी लग्न करण्याचे ठरवतो. मात्र एका भाविणीची मुलगी आपली सून होणार ही कल्पना कर्मठवृत्तीच्या खळूदादांना सहन होत नाही. मात्र हृषी आपल्या निश्चयाशी ठाम राहतो.

पुढे शेवंतीला अनपेक्षितपणे स्वतःच्याच जन्माचे रहस्य उलगडते. विसुबाबा हा रंजनेचा पिता हाच आपलाही पिता आहे. म्हणजे रंजना ही आपली बहीण आहे, हे सत्य तिला खात्रीशीरपणे समजते व बहिणीच्या सुखासाठी उदात्त त्यागाच्या भावनेतून ती आत्मार्पण करते. निष्ठेने आपल्या भावीण धर्माचे पालन करते.

## * भावीण : भाविणींच्या जीवनदर्शनाची कादंबरी *

जीवनातील सौंदर्य आणि आनंदाचे दर्शन आपल्या कवितेतून घडविणारे कवी बा. भ. बोरकर यांनी साहित्याच्या ललितलेख, कथा, कादंबरीच्या प्रांतातही मुक्त हस्त लेखन केले आहे. त्यांनी एकूण चार कादंब-या लिहिल्या. त्यापैकी ' भावीण ' ही महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीचा लेखक मुळातच हळुवार, भावविवश कवी. मग त्याच्या या कादंबरीतही त्याचे कणवयुक्त, सहानुभूती दाखविणारे मन उतरले नाही तरच नवल ! भावीण, जोगतीण, देवळी, मंगेशी, बसवी, यांसारख्या देवदासींकडे पाहताना एकूण मराठी कादंबरीकारांचाच दृष्टीकोण सामाजिक, आणि सहानुभूतीपूर्ण बनतो. उपेक्षेच्या गर्तेत जीवन जगणा-या या सर्व देवदासींना समाजात एक प्रकारचा न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका या लेखकांनी घेऊन त्यांना ' आदर्श ' बनविले आहे दयापूर्ण बनवले आहे. त्यांच्या जीवनातील प्राक्तनभोगात परंपरागत धर्म आणि गृहस्थी जीवन यांच्यात एक प्रकारचय संघर्ष आहे. तो

संघर्ष केवळ आजकालचा नाही तर सनातन आहे. धर्मशास्त्राच्या गुंत्यात अडकलेले मन आणि देहधर्माच्या व्यावहारिक गुंत्यात गुरफटलेले मन यात विलक्षण तडफड चालते. ही तडफड प्रत्यक्ष साहित्यात उतरवताना या प्रत्येक गोष्टीकडे सामाजिकतेच्या पातळीवर लेखकाला आपले लक्ष केंद्रित करावे लागते. प्रत्यक्ष अनुभवातून काही गोष्टींचे चिंतन करावे लागते. तरच एखादी चांगली साहित्यकृती आकार घेते, साकार होते.

' भावीण ' ही बा. भ. बोरकरांची अशीच एक महत्वाची कादंबरी. ही कादंबरी लेखकाने केवळ तंत्रदृष्टया केलेली रचना नसून त्याचा तो सामाजिक जाणिवेचा सहजस्फूर्त अविष्कार आहे. ही कादंबरी प्रादेशिक कादंबरीच्या मापदंडाने मोजली जाते, ते खरे आहे. पण केवळ ती गोव्याच्या सौंदर्यवर्णनातच गुरफटलेली नाही तर गोमंतकीय प्रदेशातील मानवी जीवन, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा आणि निसर्गसौंदर्याचा वेध घेणारी आहे. आपल्या अनुभवातून व आविष्कार पद्धतीतून ती वास्तव व जीवनदर्शी करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीची नायिका शेवंती भावीण ही धर्मवृत्तीतून निर्माण झालेल्या परिस्थितीची बळी ठरली आहे. ध्येय, निष्ठा, कर्तव्य आणि पावित्र्य या चौकटीतच तिचे आत्मसमर्पण झाले आहे.

या कादंबरीचे कथानक सामाजिक व वाड्.मयीन दृष्टीनेही निश्चितच महत्वाचे आहे. गोमंतकातील निसर्गरम्य वातावरण, तेथे आढळया-या भाविणी, तेथील सामाजिक व सांस्कृतिक परंपरा, त्यातून आलेले नीति-नियम, या वातावरणातच दोन प्रेमीजीवांचे फुललेले प्रेम. सामाजिक रूढी बंधनामुळे प्रेमातून निर्माण होणारी विफलता, निसर्गनियमांबरोबरच नियतीच्या फे-यात सापडलेली वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्ती व स्वभावाची माणसे, माणूस कितीही लहानमोठा असला तरी त्याच्या जीवनात येणारी हलबलता व त्यातून जीवनाविषयी वाटणारी निरर्थकता, या संबंधातील अनेक प्रसंग या कादंबरीतून हाताळलेले आहेत. ही कादंबरी वाचत असताना वास्तव जीवन दर्शन घडत जाते. वाचकात एक प्रकारची उत्कंठा कायम राहते. कादंबरी वाचून हातावेगळी झाल्यानंतर सामाजिक चौकटीच्या आत बळी ठरणा-या व्यक्तीविषयी वाटणारी हळहळ अंतःकरणात खोलवर उतरत जाते.

या कादंबरीची नायिका शेवंती ही एक ' भावीण ' आहे. देवळातील देवाची दासीप्रमाणे सेवा करायची आणि आपल्या उपजीविकेसाठी ' वारांगना ' बनायचे, हा तिच्या कुटुंबाचा परंपरेने चालत आलेला व्यवसाय आहे. सौंदर्याचा वारसा जन्मजात लाभलेली शेवंतीही तशी रूपखणी तरूणी होती. अप्सरेसारखं सौंदर्य आणि गंधर्वाचा गळा तिला जन्मजातच मिळाला होता. पण परंपरेने तिची वार

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

देवळात पुरली होती. मोठमोठे लोक, फिरंगी फिल्दाग तिने जरा डोळा द्यावा म्हणून जीव टाकत होते. पण ती मात्र दारी आलेली लक्ष्मी लाथेने लोटून घुतल्या गौरीसारखे आपले तारूण्य जाळून टाकीत होती. तिच्या रक्तात भक्तिभाव पूर्णपणे भिनलेला होता, ती प्रणयाकुल होती हे ही तितकेच खरे आहे. पण भाविणकन्या असूनही लैंगिक वासनेचा क्षुद्र विचार तिच्या मनात किंचितही आढळत नाही उलट शांतादुर्गेच्या प्रतिकृतीसाठी नमुना म्हणून अंताशेठ जेव्हा शेवंतीची निवड करतो तेव्हा त्याने आपल्यावर खूप मोठे उपकारच केले आहेत, असं तिला वाटते. म्हणूनच ती म्हणते, " प्रत्यक्ष जन्मापेक्षाही श्रेष्ठ असा जन्म तुम्ही मला दिला आहे. वासनेचा विषय झालेल्या माझ्या या शरीराला देवीची प्रतीमा होण्यापेक्षा अधिक चांगली सद्‌गती ती काय लाभायची ? ' हा विचार ज्यावेळी ती व्यक्त करते त्यावेळीच तिच्या भाविणींच्या धर्माविषयीचा तिच्या मनात निर्माण झालेला तिटकारा आपणाला स्पष्टपणे जाणवतो. कलाकृतीसाठी नमुना म्हणून अंताशेठ तिची निवड करतो त्यावेळी नियतीविषयी स्वतःला कल्पना असूनही शेवंती होकार देते. यावरून शेवंती ध्येयाने प्रेरित झालेली आहे असे वाटते. पण प्रत्यक्षात ती तिच्या परंपरागत व्यवसायात पूर्णपणे घुसमटून गेलेली आहे. त्या व्यवसायातून बाहेर पडण्यासाठी ती तळमळत आहे, झगडत आहे म्हणूनच परंपरागत जगण्यात जखडून गेलेली फुलवंती आणि त्या जगण्याची ओढ नसलेली शेवंती या मायलेकीतील प्रवृत्ती संघर्ष लेखकाने येथे दाखवला आहे. अंताशेठ फुलवंतीच्या घरात येऊन प्रथम बसतो तेव्हा फुलवंती शेवंतीला हाका मारते. पण ती प्रतिसाद देत नाही. देवळात गेलेली असते, त्यावेळी बडबडत त्राग्याने फुलवंती म्हणते, " ही भटीण गेली वाटतं देवळात. " या वाक्यावरून मळलेली वाट न तुडवण्याची शेवंतीची इच्छा आपल्याला जाणवते.

भाविणीच्या धर्मात जगत असलेल्या फुलवंतीला वारांगनेचेच जीवन जगावे लागत आहे. तीही पूर्वी शेवंतीप्रमाणेच रूपखणी होती. आता तिचे वय उतरणीला लागले होते. तरीसुद्धा आहे त्या सौंदर्याच्या आधारावर तिला जगण्यासाठी फार मोठी धडपड करावी लागत होती, हे लेखकाने अतिशय सुंदर सूचकतेने येथे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अंताशेठीने आणलेल्या माशावर फुलवंतीची नजर जाते. ' मावळत्या उन्हात ती चणाक जिवंत चांदीप्रमाणे चमकत होती. अजून तिचे गालफड वरखाली होत श्वास टाकीत होते. ' ते पाहून ती म्हणते, ' मोठीच मेहेरनजर आहे म्हणायची आमच्यावर. ' माशाच्या या प्रतिकातून फुलवंतीची आहे त्या परिस्थितीत जगण्यासाठी चाललेली धडपड लेखकाला सूचित करावयाची आहे. या वयातही स्वतःच्या तोंडाला पावडर फासून इतरांच्या समोर बसावं लागतंय याचेच दुःख तिच्या मनात आहे. यासाठी ती आपल्या दैवालाच दोष देते

ही फुलवंती देखील स्वतःच्या तरूण वयात या व्यवसायाचा तिरस्कार करणारीच होती. ती ' विसुबाबा ' या ब्राह्मणावर मनापासून प्रेम करीत होती. त्यासाठी ती मोठमोठया फिरंगी फिल्दागांना, शेठ-भाटियांना धुडकावून लावत होती अंताशेठीने ही गोष्ट दाखवून दिली आहे. पण फसवणुकीने तिला चांगलेच पोळून काढले होते. म्हणूनच परंपरेच्या चक्रात फिरत तिला तिच्या व्यवसायाच्या आधीन व्हावे लागले होते. धर्माच्या चौकटीत तिने धंदा सुरू केला होता.

शेवंती ही तिची मुलगी अगदी मिठ्ठास बोलणारी आहे. त्यासाठी ती भावीण ना मी ? असे स्पष्टीकरण देते. म्हणजे मिठ्ठास बोलून आपला कार्यभाग उरकणे हे जणूकाही भाविणीच्या रक्तातच मुरलेले असते. पण या शेवंतीला हा भावीण धंदा व परंपरागत जीवनातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा आहे म्हणूनच ' स्वच्छ ' राहण्यासाठी ती धडपडते आणि मुलीच्या संपूर्ण आयुष्याच्या विचाराने फुलवंती मनापासून तळमळते आणि म्हणूनच त्रागा व्यक्त करताना आपल्या मुलीला ती म्हणते. ' "बामणपणाचे डोहाळे म्हणजे भिकेचे डोहाळे. प्रेमाचे नाटक करत लोक जीव लावतात पण चारचौघात भाविणींनी बोलावले तर ओळखही दाखवित नाहीत. " ही वस्तुस्थिती प्रत्यक्ष अनुभवल्याने फुलवंतीला त्याची पूर्ण कल्पना आहे. सुधारणेचा राजकीय खोटा प्रचारकी रोखही ती ओळखून आहे. म्हणूनच अंताशेठीला ती म्हणते, ' पिढयांची इस्टेट करून ठेवून आमच्या सारख्यांना उपदेश करायला काय जातं या पुढा-यांच ? माझ्यासारख्या गरीब भाविणीच्या मुलीशी बाशिंग बांधायला या पुढारी म्हणविणा-यांपैकी आहे का कोणी तयार ? धिंडवडे आणि सत्यानाश थांबविणार म्हणे ? काही थांबणार नाही. वाढणार आहे. उलट धर्म म्हणून करीत होतो तेच पुढे अधर्म म्हणून करावं लागणार ' भाविणीना धर्म म्हणून आपला व्यवसाय करताना पुढे ' धंदा ' करावा लागणार आहे. आणि बदलत्या परिस्थितीला सामोरे जाताना त्यांचा प्रामाणिकपणा त्यांना टिकवता येणार नाही याची खंतदेखील फुलवंतीच्या मनात आहे. कारण ती तिच्या धर्माशी निष्ठा ठेवून आहे. प्रामाणिक आहे, हेच येथे स्पष्ट दिसते.

भाविणीच्या मुलीला आई असते पण बाप नसतो. म्हणूनच भावीणकन्या दुःखी असतात. आपणाला चांगला मार्ग दाखवणारा, आपल्या मनातील दुःख ओळखून आपल्यातील मांगल्याचा आदर करणारा बाप असावा, असे त्यांना मनातून वाटत असते. तेवढा विश्वास अंताशेठीकडून मिळाल्यानंतर शेवंतीचे हृदय भरून येते. ती आपल्या आईपेक्षा त्याच्याजवळच सुखदुःखाच्या गोष्टी बोलते. त्यातूनच फुलवंती आणि तिच्या जीवनात भावीण धर्मामुळे निर्माण झालेल्या दुःखाची कल्पना येते.

शेवंतीचे पुढील आयुष्य चांगले जावे म्हणून तिच्या भवितव्यासाठी फुलवंती तिला धंद्याला लावू पाहत होती. परंतु शेवंतीचा त्याला विरोध होता. पण एका युरोपियन जज्जाशी बोली ठरवून फुलवंती

शेवतीच्या अंगावर दागिने चढविते आणि तिच्या मनाविरूद्ध सारे शरीरधर्म घडून जातात त्यावेळी शेवंतीच्या डोळयातून ओघळणारे अश्रू पाहून तो जज्ज तिला माझ्याकडून काही अपमान झाला का, असे प्रामाणिकपणे विचारतो. त्यावर शेवंती म्हणते, ' आम्हाला कुठला आला आहे मान अपमान ? पुरूषाच्या वासनेने स्त्री हृदयाचा आजवर कितीसा विचार केला आहे ? त्यात आमची तर भाविणीची जात. आमच्या कासोटयाची कुणीही चेष्टा करावी, ' तिच्या या बोलण्यातून आपल्या जन्माविषयीचा, जगण्याविषयीचा मनातील विखारच अगदी जळजळीतपणे बाहेर पडला होता. पुढे त्या कुलीन, सुसंस्कृत जज्जाने तिला नियमितपणे पैसे आणि पत्रे पाठवायला सुरूवात केली सुरवातीला तिने ते नाकारले पण नंतर नाईलाजाने तिला ते स्वीकारावेच लागले. आपल्या आईला आपले मन, भावना कळत नाहीत असं ती म्हणते. पण आपलं तारूण्य ओसरण्यापूर्वीच त्याच्या आधारावर शेवंतीने जमेल तेवढा धनसंचय करावा नाहीतर म्हातारपणी उष्टी-खरकटी काढण्याचा प्रसंग तिचयावर येईल, असे फुलवंतीला वाटत असते. म्हणूनच अनेक गणिकांची उदाहरणे देऊन तो आपला धर्म आहे. असे ती वारंवार शेवंतीला बजावत असते. त्या पाठीमागे आपल्या मुलीच्या भवितव्याविषयीच तिच्या मनात भीतीयुक्त प्रश्नचिन्ह असते म्हणूनच स्वतःच्या अंतःकरणात ती तीळतीळ तुटत असते पण शेवंतीही आपला धर्म, समाज, निष्ठा ओळखत होती. समाजातील ज्या ज्या माणसांकडे आपले आदाराने लक्ष जाते तीच माणसे वृत्तीने अतिशय नीच असतात. आपल्या सारख्या मुलीचे शील विकून ती आपलं पोट जाळतात, याचा तिला मनातून खूप राग आहे. समाज आपल्याकडून निष्ठेची अपेक्षा करतो पण तो समाजच निष्ठाहीन आहे असे ती म्हणते म्हणूनच समाजातील अनेक पुरूष आपली लग्नाची बायको सोडून आमच्याकडे येतात. आमचे तारूण्य ओसरल्यानंतर पुन्हा ते आमच्याकडे पाठ फिरवतात. हे सांगताना शेवंती भाविणीचा प्रामाणिकपणा आणि त्याच्यातूनच एकूण भाविणींच्या वाटयाला येणारे दुःख ती सांगून जाते. आम्हा भाविणींची जात निर्माण केल्याबद्दल समाज गुन्हेगार असला तर समाजाने अपेक्षिलेली निष्ठा न दिल्याबद्दल आम्ही भाविणी पतित आहोत. तसं नसतं तर पतित समाजात आम्ही पवित्र ठरलो असतो, असेही ती प्रामाणिकपणे बोलून जाते.

हा प्रामाणिकपणा या भ्रावीण मायलेकींच्या स्वभावाचाच एक भाग बनून गेला आहे. पालखीच्या वेळी मूर्च्छित पडलेल्या शेवंतीवर डॉक्टरांकडून केशव उपचार करतो पण तो पैसे मागत नाही ते पाहुन फुलवंती त्याला म्हणते, ' दान देणारा विसरून जातो पण घेणा-याला विसरून कसे चालेल ? ' पुढे देवळात अभिषेकासाठी आलेल्या केशवला सोनचाफयाची फुले देणा-या शेवंतीच्या कर स्पर्शाने शांती भंग पावलेला केशव भटजी करवी शेवंतीला बंदे रूपये देऊन जातो. त्यावेळी शेवंती म्हणते, ' देवळातल्या सेवेबद्दल आम्हाला वतन आहे मग मी पैसे कसे घेऊ ? ' मात्र केशवच्या

ध्येयवादाने ती त्याच्यावर अनुरूक्त झाली होती. त्याच्या विषयी तिच्या मनात दिव्य पावन लहरी खेळत होत्या. तो विवाहित पुरूष आहे हे माहित असुनही नरकात उभी राहुन दिव्य लोकातल्या पुण्यात्म्याची आपण पूजा करीत आहोत असे तिला वाटत होते. या प्रेमाची ज्यावेळी तिला तिच्या मनातून खात्री झाली त्यावेळीच तिने आपल्या युरोपियन जज्जाला पत्र लिहून त्याच्याकडून येणारे पैसे नाकारले होते. पत्नीधर्मापेक्षा भाविणीच्या धर्मातील दारूणताच तिच्या वाटयाला आली होती आणि ती तिने प्रामाणिकपणे स्वीकारली होती. हे सर्व पाहून मनातून उन्मळून कोसळलेली फुलवंती शेवंतीला म्हणते, ' आम्हा भाविणींना भावना हव्या पण त्या मिळणं आमच्या नशिबी नाही.' तरीही केशववरील प्रेमामुळे त्याच्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी महारवाडयावर जाऊन शेवंती तेथील मूलींना शिकवू लागली, आणि सगळयांच्या टीकेचा ती विषय झाली. एकदा तर देवळातला भटजी तिला म्हणाला,' तिकडे महारवाडयात जातेस आणि इकडे देवळातही येतेस होयना ?' त्यावेळी एकदम चिडून ती म्हणाली, ' भाविणीला आणि गंगेला कसलाच विटाळ नसतो ना ? भाविणीच्या घरून आलेल्याला देवीच्या गाभा-यात काही मज्जाव नसतो.'

डोक्यावर परिणाम झालेल्या हृषिचे वेड जाण्यासाठी त्याचे लग्न होणे गरजेचे आहे, असे डॉक्टर सल्ला देतात. पण त्याचे सख्खे मामा विसूबाबा असे लग्न धर्मशास्त्र संमत नाही म्हणून टाळतात. त्याचे कर्मठ बाबा रवळूदादा शेवंती भाविणीकडे त्याला पाठवण्यास सुरूवातीला तयार नसतात. 'व्यक्तीच्या मोहानं कुटुंबाला खाली न्यावं हा कोठला न्याय ?' असे ते विचारतात. मात्र केशव त्यांची समजूत घालून शेवंतीकडे येतो. तिच्या भावीण धर्मालाच तो हात घालतो त्यावेळी ती केशववरील प्रेमापोटी हृषीची सेवा करण्याचा निर्णय घेते पण अंत:करण विदीर्ण झालेली ती केशवला म्हणते, ' आम्ही भाविणी असलो म्हणून आम्हाला काही अंत:करण, व्यक्तित्व, स्वाभिमान नाहीच का ? पैशापायी लाज, लज्जा, शरम सगळं आम्ही कोळून पिऊन बसलो आहोत हीच का आपली समजूत ? ' या तिच्या वक्तव्यातूनच भाविणींचे मन आणि इतरांच्या बरोबरीने जगण्याची त्यांच्या हृदयात असलेली इच्छाच प्रकर्षाने प्रकट झाली आहे. तरीही केशवसाठीच आपले प्रेम ती प्रामाणिकपणे धर्माच्या होमात समर्पित करते. आपल्या अंगात भावीण धर्माप्रमाणे जगण्याची शक्ती यावी म्हणून ती शांतादुर्गेला प्रार्थना करते. प्रेमातसुध्दा भावनांची अपेक्षा न करणे हाच त्यांच्या कर्माचा भाग बनला आहे. कुटुंबाच्या खोटया प्रतिष्ठेसाठी हृषीसारख्या बुध्दिमान तरूणालाच संपला तरी चालेल पण भाविणीकडे पाठविणार नाही, असे म्हणणारा रवळूदादासारखा कर्मठ बाप आणि त्याच हृषीला वाचविण्यासाठी उदात्त अंत:करणाने सामो-या जाणा-या प्रेमळ शेवंतीचे समर्पण हे ' भावीण ' धर्माची श्रेष्ठता दाखविणारे आहे. भाविणींचे जगणे, त्यांचा धर्म, न्यायनीतीच्या पातळीवर कितीही अपवित्र, वाईट असले तरी त्या धर्मात जगणा-या भाविणी आपल्या धर्माशी किती प्रामाणिकपणे चिकटलेल्या होत्या हेच येथे दिसते. देवीच्या या लाडक्या मुलींना

धर्मपालनासाठी वेडयाविद्रंयाशीही जवळीक करावी लागते.

अशी ही भावीण प्रतिष्ठितपणे जगू इच्छिणा-यांना ' तुमच्या या समजात आम्हाला स्थानच नाही का ?' असा अगतिक होऊन प्रश्न विचारते. आपण भावीण । अतिशूद्रापेक्षा हीन ।। हे समजल्यामुळे ती अति दु:खीकष्टी झाली आहे. हृषीला बरे वाटल्यानंतर तो आपल्या घरी गेला. पुन्हा लवकर तो शेवंतीची विचारपूस करीत नाही तिला भेटतही नाही. त्यामुळे ती तळमळते. उशिरा भेटलेल्या हृषीला त्याच त्वेषाने ती म्हणते, ' आम्ही भावणी ना ? समया पुसणं आणि झाडलोट करणं हे आमचं काम. सारं स्वच्छ करावं, घणघणीत प्रकाश घालावा आणि मग मळक्या फडक्याप्रमाणे किंवा केरसुणीप्रमाणे कुठं तरी कोप-यात तोंड काळं कराबं, हे आमचं प्राक्तन ।' आपल्यापेक्षा आपल्या शरीरावरच समाजाचे लक्ष असते. त्यात त्यांच्या प्रेमाची भावना नसते, याची जाणीव शेवंतीला आहे. म्हणूनच ती आपल्या शरीराचा एखाद्या जीवनाची समई उजळण्यासाठी जरी उपयोग झाला तरी सार्थक झाले असे म्हणते.

मात्र भाविणीशी संबंध आल्यामुळे पावित्र्य भंगले. त्यासाठी प्रायश्चित घेऊन अभिषेक घातला पाहिजे, असे म्हणणारे कर्मठ प्रवृत्तीचे रवळूदादा, धर्मग्लानीने पापपुण्याच्या अमानवी व्यवहारात गुंतलेलेच येथे दिसतात. त्यांच्या दांभिकपणापुढे शेवंतीच्या समर्पणाला काहीच महत्व दिसत नाही हेच वाईट आहे. प्रायश्चित टाळणं म्हणजे धर्मद्रोह होईल, असे वाटते म्हणजे हृषीसारख्या बुद्धिमान व्यक्तीला आपल्या सेवासमर्पणाने माणसात आणण्यासाठी शेवंतीने पाळलेला भावीण धर्म आणि अशा माणसात आलेल्या हृषीला समाजात स्थान देण्यासाठी घ्यावा लागणारा प्रायश्चितविधीचा धर्म यात शेवंतीचा धर्मच श्रेष्ठ ठरत असला तरी तिला तशी सामाजिकतेच्या पातळीवर किंमत शून्यच । तरीसुद्धा ती त्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ वाटते. कारण हृषी तिच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवितो त्यावेळी ती त्याला समजावत म्हणते, ' मी भाविणीची मुलगी आहे. कुलवंताची गृहस्वामिनी होऊन पतीव्रतेचे जीवन जगणे मला कितपत शक्य होईल याचा विचार केला आहेस का ? माझं पूर्वजीवन तुझ्या भावी जीवनात काय उत्पात करील ? म्हणजे आपल्या जीवनाची आणि आपल्याला समाजात असणा-या स्थानाची तिला जाणीव आहे. ती जाणीवच तिला श्रेष्ठ ठरविते.

विवाहित केशववर तिचे अंत:करणापासून प्रेम होते, हे खरे आहे. पण ते प्रेम एकांगी ठरणार, यशस्वी होणार नाही याचीही तिला जाणीव आहे. पण ती त्या प्रेमाशी प्रामाणिक आहे. भाविणींच्या धंद्यात शेवंती रमत नाही, याचे भान फुलवंतीला आहे. शेवंतीने हृषीशी लग्न करावे ही बाब तिला पसंत नाही. ते लग्न पाप - पुण्याच्या पातळीवर तपासून पाहण्याचा ती प्रयत्न करते.

आपल्या जातीत लग्न फळाला येईल आणि तेही एका ब्राहमणाशी केलेले हे तिला खरेच वाटत नाही. मात्र स्वत:च्या सुखाचा हव्यास बाळगून जीवन अपेशी करून घेण्यापेक्षा दुस-याला सुख देण्याचा ध्यास घेणेच चांगले, अशी शेवंतीच्या मनाची धारणा आहे. हृषीशी लग्न करू इच्छिणारी रंजना ही आपली बहीणच आहे, असे तिला समजते तेव्हा इतरांच्या जीवनात दु:ख निर्माण करीत जगण्याचा खोटा लोभ का ? असा फार उच्च पातळीवरचा प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो म्हणूनच आपल्या लौकिक जीवनाची आशा ती सोडून देते. प्राणार्पणासाठी ती सिद्ध होते.

समाजातील सर्वच भाविणींची ' प्रतिनिधी ' म्हणून शेवंती या कादंबरीतून पुढे सरकत आहे. भाविणींचे जीवन हे सामाजिक पातळीवर किती खालच्या स्तरावर असते याचे वास्तवदर्शन बोरकरांनी या कादंबरीतून घडवले आहे. बोरकर ज्या ठिकाणी जन्मले, वाढले ते ठिकाण म्हणजे गोमंतकाचा प्रदेश. या गोमंतकातील आपल्या अवती - भवतीच्या स्त्रिया, त्यांच्या समस्या, त्यातून निर्माण होणारे त्यांचे दु:खं हे त्यांनी जवळून पाहिले. त्यांच्या कनवाळू हृदयात त्यांच्याविषयी करूणा निर्माण झाली. म्हणूनच भाविणींच्याबद्दल असणा-या नीती-अनीतीबद्दलच्या कल्पना, दुष्ट चालीरीती, रूढी, स्त्रियांचे दास्य, अंधश्रद्धा या विषयी त्यांनी मानवतेच्या पातळीवरून लिहिले आहे. त्या त्यांच्या लिहिण्यात एक प्रकारची मूल्यविषयक जाणीव दिसते. संयम, समर्पण, कर्तव्य, निष्ठा, प्रेम हे गुण मानवी जीवनात आवश्यक आहेत. याचे भान भाविणींना फार चांगले असते. म्हणूनच सेवाधर्म हाच त्यांचा स्व-धर्म बनून जातो, हे बोरकरांनी प्रत्यक्ष आपल्या निरीक्षणातून अनुभवले आहे आणि तेच या कादंबरीतून उतरले आहे.

× भावीण : - सामाजिक समस्येचे दुर्दैवी अपत्य ×

' भावीण या कादंबरीत शुध्दविचारांच्या सात्विक, बुध्दिमान शेवंती भाविणीला नाईलाजाने शरीर होमावे लागते. याचे बोरकर दर्शन घडवितात. बोरकरांना भाविणीच्या ' समस्या ' त रस नसावा. भावीण शेवंती इतरांपेक्षा वेगळी आहे, आदर्श आहे, असे बोरकरांना दाखवायचे आहे. फ्रेड, हृषी, केशव, यांच्याशी तिचे संबंध वेगवेगळया पातळीवरचे आहेत. शेवंतीच्या व्यथांचा शोध घेण्यापेक्षा ती ' आत्मसमर्पण ' करते, असे चित्र रेखाटून त्यांनी उदात्तीकरणाचा मार्ग अनुसरलेला दिसतो. '[२१]

या कादंबरीची नायिका शेवंती ही विचाराने शुध्द, सात्विक आणि बुध्दिमान आहे. मुळात समस्येतून जन्माला आलेल्या शेवंतीला अनेक दु:खकारक प्रश्नांच्या साथसंगतीने जगावे लागत आहे.

नशिबी आलेला परंपरागत भाविणीचा धर्म तिला मनापासून आवडत नाही. ती त्यापासून बाहेर पडण्याचा मनापासून प्रयत्न करते. हे तिच्या विषयीच्या फुलवंतीच्या त्राग्यातून आपल्या लक्षात येते. पण शेवंती परंपरेचा आणि त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीचा बळी ठरतेय. फ्रेड, केशव व हृषी यां सारखे बुध्दिमान, कुलीन व सुसंस्कृत पुरूष। तिच्या जीवनात आले आहेत. आपल्या मनाविरूध्द आपले शरीर तिने फ्रेडच्या स्वाधीन केले होते. कुलीन, सुसंस्कृत फ्रेड ( युरोपियन जज्ज ) नंतर तिच्याशी दयाबुध्दीने वागतो. केशववरच्या आपल्या प्रेमापोटीच ती पुढे हृषीला आपली सेवा व शरीर देते. या शरीरदानात हृषीवर तिचे प्रेम नव्हते. फक्त धर्म आणि कर्तव्याचा भाग ती उरकत होती. आपला भावीणधर्म कर्तव्यनिष्ठेने ती पार पाडत आहे. हे संबंध वेगवेगळया पातळीवरचे आहेत, पण आदर्शाच्या पातळीवर ते मांडत असताना या संबंधांच्या मुळाशी शेवंती ही ' भावीण ' आहे हे महत्वाचे. तिच्या शरीरात असलेल्या भाविणीच्या रक्तातच अनेक समस्या आणि त्या पाठीमागून येणारी दुःखाची मालिका आहे. कोणतीही घरंदाज / संसारी स्त्री आपले शरीर परस्वाधीन करू शकणार नाही. ते धाडस ' भावीण ' करते. किंबहुना तिच्या धर्मातून सांगितलेले ते तिचे कर्तव्यच ठरते. एखादी वस्तू सहज उचलून द्यावी त्याप्रमाणे ती आपले शरीर देते. अगदी वेडयाविंद्रयाला देखील, ते का ? याचा वेगळा शोध घेण्याची गरजच नाही.

बोरकरांना भाविणींच्या समस्येत रस नव्हता असे नाही. रक्ताने आतेबहीण असलेल्या एका भावीणकन्येची, शोकांतिका त्यांनी आईच्या तोंडून ऐकली होती. त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. म्हणूनच ते म्हणतात, 'ब्राहमण्याच्या आणि सुसंस्कृतेच्या अभिमानात माझ्याकडून झालेल्या तिच्या उपेक्षेच्या अनुतप्त जाणिवेतून या कादंबरीचे बीजारोपण झाले '[3] अशी त्यांनी प्रस्तावनेत कबुली दिली आहे. या कादंबरीची मांडणी वास्तवदर्शन घडवणारी आहे. कल्पनारम्य, मनोविश्लेषणात्मक आणि सौंदर्यदर्शन घडवणारी योजकता लेखकाने वापरली आहे. या कादंबरीतून लेखकाने केवळ शेवंतीच्या व्यथांचा शोध घेतला असता तर ती कादंबरी ' व्यक्तिगत ' पातळीवर उठावदार झाली असती. या कादंबरीची नायिका शेवंती ही ' भावीण ' आहे. भाविणींच्या जीवनाचे प्रातिनिधीक दर्शनच शेवंतीच्या भावजीवनातून लेखकाने घडवले आहे. कादंबरीत वास्तवदर्शन, मनोविश्लेषण आणि भावीणधर्माचा सुरेख संगम लेखकाने घडवून आणला आहे. लेखक मुळात सौंदर्यदृष्टी असणारा हळुवार मनाचा भावकवी आहे. म्हणूनच ही कादंबरी काव्यात्म पातळीवर उदात्तीकरणाचा मार्ग अनुसरत उतरली आहे. ' ' भावीण ' ही तिच्या धर्माशी प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ असते. या पातळीवरच शेवंतीही आदर्श उतरली आहे. लौकिक अर्थाने सांसारिक जीवनाची तिला ओढ आहे. केशवचा ध्येयवाद पाहून

त्याच्यावर ती अनुरूक्त झाली पण तो तिच्या बहिणीचा ( कमली ) पती होता. म्हणजे स्वतःच्या सुखासाठी तिला दुःखात लोटावे लागणार. जो हृषीशी लग्न करू इच्छित होता तो तिच्याच दुस-या बहिणीचा रंजनेचा नियोजित वर होता. म्हणजे तिचे सुख हिरावून घेऊन तिच्यासमोर जगणे तिला अगदीच अशक्य होते. या पातळीवर तिची मानसिक उलघाल होत होती. या उलघालीत तिला स्वतःच संपण्याशिवाय पर्याय नव्हता. म्हणजे समाज व व्यक्तिस्वातंत्र्याच्या झगडयात आत्मसमर्पणाशिवाय अन्य मार्गच तिला दिसत नव्हता.

प्रीती ही एक शक्ती आहे. ही शक्ती ज्याला लाभली तो अनपेक्षित व आश्चर्यकारक कृती करू शकेल. प्रीतीच्या उदात्त समर्पणाच्या भावनेने विकृती दूर करणारी बोरकर यांची भावीण चटकदार उतरली आहे. [4]

तीन पुरूष आपल्या आयुष्यात येऊनही विवाहित केशववरच्या प्रेमाने त्याचा विश्वास संपादन करण्यासाठीच शेवंती हृषीच्या सेवेत रत होत. आणि त्याचा मानसिक ताण दूर करून त्याला विकृतीतून सोडवते. एखाद्या व्यक्तीला मानसिक विकृतीतून सोडवण्यासाठी कोणतीही घरंदाज स्त्री ' तनामनाने ' सेवा करण्यास तयार होणार नाही. इतकेच काय हृषीच्या नियोजित वधु रंजनेलाही अशाप्रकारचे विवाह धर्मसंमत नाहीत म्हणून बाजूला ठेवले जाते. ' लग्न केल्याशिवाय वेड जात नाही व वेड गेल्याशिवाय लग्न होत नाही.' अशा परिस्थितीतून हृषीची सोडवणूक करण्यासाठी शेवंती भावीण सर्व निभावून नेते. हृषीचे प्रेम शेवंतीवर असते, आणि जळत्या घरातील कागदपत्रे वाचवण्यासाठी जिवावर उदार होऊन आत घुसलेल्या शेवंतीला वाचवण्यासाठी हृषी धावतो आणि त्याचे वेड जाते. यात एक दुस-यासाठी समर्पित होत असतानाच नकळत भावसंबंधात गुंतत जातो त्यामुळेच प्रसंग चटकदार वाटतात पण स्त्री-पुरूष संबंधाची परिणती विवाहात व्हावी हे सरळ होय. न झाली तर एरव्हीच्या समाजात त्या स्त्रीची अवस्था हीन दीन होते. ' भावीण ' या जमातीत असे होत नाही. भाविणीतही काही आदर्श असतात. या कादंबरीत शेवंतीचे आदर्श आत्मबलीदान जाणवते व तिच्याहून समाजात थोर मानलेल्याचे स्वार्थ व नैतिक अधःपतन आढळते.[5] स्त्री-पुरूष संबंधाकडे पाहताना समाज नीति-अनीतीच्या पातळीवर विचार करतो. रूढ नियमाच्या चाकोरी बाहेरील अशा प्रकारच्या संबंधांना ' अनैतिक ' तेचा शिक्का मारला जातो. म्हणूनच स्त्री-पुरूष संबंधांची परिणती विवाहात होणे योग्य ठरते. भाविणींच्या बाबतीत अनैतिकतेचेच उदात्तीकरण झालेले आढळते. भाविणींना अधर्मालाच धर्म म्हणून स्वीकारावा लागतो. अनैतिकता हीच त्यांच्या बाबत नैतिकता ठरत जाते. यात विषयलंपट लोकांचे भोगलालसेपायी चाललेले अधःपतन समाज राजरोसपणे खपवून घेतो यात समाजात थोर समजल्या जाणा-या लोकांचा स्वार्थच दिसतो. या कादंबरीतले

A
12025

खळूदादा हे हृषीचे वडील आहेत. ते जुन्या, कर्मठ विचारांचे रक्षण करू पाहणारे आहेत. डोक्यावर परिणाम झालेल्या हृषीला स्त्री सहवास हवा असा डॉक्टर सल्ला देतात भाविणीजवळ हृषीला पाठवताना ' व्यक्तीच्या मोहानं कुटुंबाला खाली न्यावं हा कोठला न्याय ? ' असे विचारणारे ते आपली मूक संमती दाखवतात. यापाठीमागे कुलदीपकाच्या हव्यासापोटी स्वार्थी पितृप्रेम दिसते. पण नंतर हृषी बरा होऊन आल्यानंतर भाविणीशी अन्नादी इतर संबंध आल्यामुळे हृषीला प्रायश्चित विधीला सामोरे जाण्यास भाग पाडण्याचा ते प्रयत्न करतात, हे त्यांचे नैतिक अधःपतन नव्हे तर काय आहे ?

पत्नीधर्मापेक्षा भाविणींचा धर्म अतिदारूण, करूणापूर्ण आहे. फुलवंती भाविणीशी विसुबाबा या कुलीन पुरूषाचा संबंध येतो व त्यातूनच शेवंतीचा जन्म होतो. म्हणजे शेवंती ही विसुबाबांची मुलगी. या आपल्या पापाची कबुली ते आपला ध्येयवेडा जावई केशवजवळ देतात. पण हे धर्मभिरू विसुबाबा शेवंतीला आपली मुलगी म्हणून जवळ धरण्याचे मोठेपण दाखवत नाहीत. शेवंतीच्या जन्माचे रहस्य समजूनही ध्येयवादी विचारांच्या केशवने शेवंतीच्या भवितव्याच्यादृष्टीने काहीतरी मार्ग काढणे गरजेचे होते. पण हे गुपीत तो आपल्या पुरतेच मर्यादित ठेवतो आणि हृषी-शेवंतीच्या लग्नाला संमती देतो. पण हा चाललेला लग्नाचा प्रयत्न यशस्वी होत नाही. या ध्येयवेडया - समाजसुधारकाने सर्वांना विश्वासात घेऊन मध्यस्थी केली असती तर जुन्या विचारात गुरफटलेल्या सर्वांनाच ती मान्य झाली नसती म्हणूनच दारूण अवस्थेत जगत असणा-या ' भावीण ' जीवनाची शोकांतिकाच शेवंतीच्या रूपाने ठळकपणे येथे साकार झालेली दिसते. ' भावीण 'मध्ये बोरकरांनी सात्विक वृत्तीच्या शेवंताच्या होरपळीची दुर्दैवी कहाणी सांगितली आहे. आणि ते करताना तिच्या समर्पणवृत्तीचे उदात्तीकरण केले आहे.[6] हे स्पष्ट जाणवते.

भाविणीच्या जीवनावर आधारलेल्या या कथेत क्षुद्र वासनांना कोठेच थारा नसून शेवंतीच्या ध्येयनिष्ठेची, कर्तव्यनिष्ठेची आणि त्यागाची ही कहाणी ग्रीक शोकात्मिकांच्या मालिकेत शोभण्यासारखी आहे. आपल्या कलाकृतीसाठी नमुना म्हणून ज्यावेळी अंताशेठ शेवंतीची निवड करतो आणि वासनेचा विषय झालेल्या माझ्या शरीराला देवीची प्रतीमा होण्यापेक्षा अधिक चांगली सद्गती ती काय लाभायची या भावनेने नियतीची कल्पना असूनही शेवंती रूकार देते. त्यावेळीच तिच्या ध्येयनिष्ठेची कल्पना वाचकांना येते आणि हृषीच्या सानिध्यात तर तिचा त्याग व तिची कर्तव्यनिष्ठा पणास लागून तिचे व्यक्तीत्व अधिक खुलते. शेवंती व्यतिरिक्त अंताशेठ, रंजना, फ्रेड, केशव यांचेही व्यक्तिचित्रण अतिशय उठावदार असून हृषीच्या भावनांची आंदोलने ही बोरकरांनी अतिशय कुशलतेने प्रकट केली आहेत.[7]

रसिकता, हळवेपणा आणि चिंतनशीलता यांचा एकाचवेळी अविष्कार करून भाविणींच्या जीवनाविषयी वाचकांच्या मनात एक प्रकारची सहानुभूती, करूणा निर्माण करण्याचा प्रयत्न बोरकरांनी या कादंबरीतून केला आहे. शेवंतीचा मृत्यू हा वाचकांना सहन न होणारा आहे, यातच कादंबरी लेखकाची यशस्विता आहे. वाचक अंतर्मुख होऊन भाविणीच्या जीवनाविषयी विचार करतो. हृषी व शेवंतीचा विवाह हा अनेकांना अपेक्षित वाटतो पण अशा प्रकारचे लेखन करून लेखकाला समाजपरिवर्तनाच्या चळवळीत उतरायचे नाही तर सामाजिकतेच्या पातळीवर समाजातील एक समस्या आणि त्या समस्येत होरपळून निघणा-या स्त्रीचे दु:ख आपल्यासमोर उत्कटपणे मांडायचे आहे.

या कादंबरीतील फुलवंती - शेवंती, हृषी - रवळूदादा यांच्यातील प्रवृत्तिसंघर्ष हा एका वैचारिक पातळीवरूनच प्रकट झाला आहे. कोठेही भडक किंवा प्रचारकी स्वरूपाचे लिखाण आलेले नाही. बोरकरांच्या प्रदेशविषयक सूक्ष्म निरीक्षणातूनच आणि गोमंतकातील सामाजिक परिस्थितीच्या चिंतनातूनच या कादंबरीतील एकेक पात्र जिवंतपणे उतरून अचूक ठिकाणी बसले आहे हे दिसते. चित्रणविषय झालेल्या भावभावनांविषयीच्या ब-याच खोल जाणिवेमुळे हृषीची व्यक्तिरेखा, शेवंतीचे निग्रही भावजीवन, केशवची अबोल ध्येयनिष्ठा, रमाक्कांची मातृश्री, रंजनेची एकनिष्ठा या सर्वांचे चित्रण मोठे परिणामकारक झाले आहे. या श्रेयांचा एकमेकाशी विरोध व त्यांच्यामधील दुर्दैवी संघर्ष देखील समजदारपणे रंगविला आहे. त्यामुळे एकटया सौंदर्यप्रतीतीतून व कल्पनारम्यतेतूनही एकप्रकारच्या मूलभूत वस्तूनिष्ठेची अप्रत्यक्ष, अंधुक पण निश्चित प्रतीती होते. [8]

सामाजिक पार्श्वभूमी लाभलेल्या या कादंबरीत अतिशय संयमाने आणि हळुवारपणे प्रेमभावना व्यक्त झाली आहे. पण हे प्रेम आदर्शाच्या पातळीवर उतरले आहे. प्रणयाने व्याकुळ झालेल्या युगुलाची तडफड येथे नाही. कोठेही भडक, बटबटीत कृत्रिमपणा न आणता भाविणीच्या मनातील कोंडी उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. जणू काही उपेक्षित समूहमनाचे अंत:पदरच प्रातिनिधिक पातळीवर अतिहळुवारपणाने येथे उलगडत गेले आहेत. या कादंबरीतील नायक आणि नायिकेच्या मनावर काही आदर्श संस्कार दिसतात. कोणताही नायक प्रेमाकुल त्यागभावनेने, धीरोदात्त वृत्तीने वागला तर कादंबरीच आदर्श बनते. ती येथे बनली आहे. म्हणूनच " भाविणीच्या दुर्दैवी संस्थेसंबंधाने सहानुभूती उत्पन्न करण्याच्या प्रयत्नात तुम्ही तिला इतकी आदर्शायण बनवली आहे की जणू काय ही संस्था कायम टिकावी असाच तुमचा अभिप्राय असावा. " या कालेलकरांच्या अभिप्रायात बोरकरांच्या जीवनदृष्टीतील सदोषता मार्मिकपणे ध्वनित केली आहे[9] हे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. या कादंबरीभर सर्वत्र विखरून असलेल्या पात्रात एक प्रकारचा मूक संवाद चालू आहे. नीती–अनीतीच्या साचेबंद कल्पनेत ती सर्व अडकून पडली आहेत. मात्र कोणत्याही उथळ भावनेला येथे शिरकाव मिळालेला नाही. प्रेमामध्ये वासनेपेक्षा त्यागभावना आली आहे त्यामुळेच कादंबरी आदर्श बनली आहे.

भाविणीच्या जीवनाची वस्तुस्थिती आपल्या समोर मांडत असताना भाविणींसंदर्भात वाचकाच्या मनात दया, सहानुभूती निर्माण होते हे म्हणणे उचित आहे. पण ही संस्था कायमपणे टिकावी असा त्याचा अर्थ लावणे योग्य नव्हे. वाचकांनी भाविणीच्या दुदैवी संस्थेसंबंधाने अंतर्मुख होऊन चिंतन करावे. त्याचप्रमाणे सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत ही संस्थाच नाहीशी व्हावी आणि त्या सामाजिक अभिसरणाने त्या संस्थेतील दुदैवी घटकांना योग्य जीवनस्तर प्राप्त व्हावा, अशी भावना वाचकांच्या मनात निर्माण व्हावी, हे अपेक्षित दिसते. स्वतः बोरकर त्यांची " भावीण " ही कादंबरी यशस्वी मानतात. प्रा. कुसुमावतीबाईंनी त्यांच्या या कादंबरीचे कौतुक केले आहे. [10] हे ही येथे विचारात घेण्यासारखे आहे.

बा. भ. बोरकरांना " भावीण " या कादंबरीत शुध्द विचारांच्या सात्विक व बुध्दिमान शेवंती भाविणीला नाइलाजाने आपले शरीर होमावे लागते. याचे दर्शन घडविताना आपल्या कादंबरीला **शोकात्मिकेचा** आकार देता आलेला नाही. [11] हे विधान विचारात घेण्यासारखे तर " भावीण " ही देवदासींच्या सामाजिक समस्येचा वेध घेणारी एक प्रादेशिक कादंबरी आहे. गोमंतकातील भाविणींचे वास्तव जीवन दर्शन या कादंबरीतून घडते. सामाजिक प्रश्नाशी निगडित असलेली ही कादंबरी कथानक व उपकथानकातून उलगडत जाताना विखुरली आहे. त्या मुळेच या कादंबरीला शोकात्मिकेचा आकार प्राप्त झाला नाही. लेखकाच्या भाववृत्तीचाही तो परिणाम असेल. पण कोकणातील स्त्रियांच्या जीवनाचा वेध घेतला तर तेथील दारिद्रय आणि एकूण सामाजिक, धार्मिक परंपरेमुळे तेथील स्त्रिया एका विशिष्ट दडपणात वावरतात. दुःखाचा आवेग आतल्या आत त्या पचवतात त्यामुळे त्यांना मनाने कधीच वाढता येत नाही. त्यांच्या भावनांची खरोखरच होरपळ होत असते. त्यांचे दुःख कोणत्या परिमाणाने मोजायचे हेच कळत नाही. वृत्तीने अतिशय सहनशील तितकीच सोशिक असणारी ही स्त्री अन्यायाविरूध्द कधीच बंड करून उठताना दिसत नाही तर ती आपल्या समोरील परिस्थितीला आणि पुरूषांना शरण जाते.

" भावीण " या कादंबरीची नायिका शेवंती ही धर्माने " भावीण " आहे. ती जे दुःख अनुभवते ते तिचे दुःखच मुळात प्रातिनिधीक स्वरूपाचे आहे. **कारण शेवंतीचे** दुःख हे सामाजिक **समस्येतून** निर्माण झाले आहे. ही कादंबरी सामाजिक समस्या मांडणारी आहे. त्यामुळे शेवंतीचे दुःख हे तिच्या व्यक्तिगत पातळीवर राहत नाही. तिच्या व्यक्तिगत जीवनातून तिच्या " भावीण " धर्माच्या सामाजिक व्याप्तीचे भान वाचकांना येते. मुळात सामाजिक समस्येचे दुर्दैवी अपत्य असणारी शेवंती हीच एक मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे कादंबरीला शोकात्मिकेचा आकार आला नसला तरी शेवंतीच्या आणि तिच्या भावीण धर्मातील स्त्रियांच्या दुःखाची तीव्रता कमी होऊ शकत नाही.

## × " भावीण " : एक प्रादेशिक कादंबरी ×

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यात " प्रादेशिक " या लेखन प्रकाराला एक विशेष स्थान प्राप्त झाले आहे. अनेक साहित्यिकांनी प्रदेशसदृश वास्तव आणि जीवनदर्शी चित्र आपल्या कलाकृतीतून रेखाटण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न केला आहे. प्रादेशिकतेत येणारा " प्रदेश " हा शब्दच मुळात प्रदेशाच्या भौगोलिक स्थाननिश्चितीचा निदर्शक आहे. अशा एखाद्या विशिष्ट प्रादेशिक भू-भागातील व्यक्ती, समाज, तेथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वातावरण, पारंपारिक रीतिरिवाज, भाषा आणि ती प्रकट करण्याची विशिष्ट पध्दती, अशा साहित्यकृतीतून व्यक्त होत असते. त्या त्या प्रदेशातील मानवी जीवन वैशिष्टयच लेखक मांडतो. कारण व्यक्ती ज्या प्रदेशात राहते त्या प्रदेशाचा, वातावरणाचा, परंपरेचा तिच्यावर फार मोठा प्रभाव पडत जातो. व्यक्ती वा व्यक्तिसमूह कोणत्याही जातीचा, धर्माचा वा प्रकृतीचा असो एरवी त्यात कितीही प्रकारची भिन्नता आढळो पण त्या सर्वांना एकत्र आणणारा, त्यावर काहीसा मानसंस्कार करणारा एक घटक असतो. तो म्हणजे तो ज्या प्रदेशात राहतो तो प्रदेश, त्या प्रदेशाची वैशिष्टये. या वैशिष्टयांचा संस्कार त्या व्यक्तीवर त्याच्या जन्मापासूनच नकळतपणे उमटत असतो. तो प्रदेश त्याच्या जीवन-जाणिवेचा एक अविभाज्य भाग बनलेला असतो. त्याच्या व्यक्तीत्वाच्या जडणघडणीशी तो संबंधित असतो. (12) म्हणून " भावीण " या कादंबरीचा विचार केला तर त्या कादंबरीचे लेखन " प्रादेशिकता " दाखविणारे आहे हे स्पष्ट होते. या कादंबरीतून केवळ गोमंतकाचा भौगोलिक प्रदेश आणि त्याची वैशिष्टयेच लेखकाने व्यक्त केलेली नाहीत तर तेथील प्रादेशिकता सामाजिकता, सांस्कृतिक, धार्मिक पातळीवर लोकांच्या रक्तातच कशी भिनलेली आहे. व्यक्ती आणि समूहाच्या जीवन जाणिवेशी, त्यांच्या भावस्पंदनाशी कशी एकरुप झालेली आहे हेच दिसते. गोमंतकातील भावीणींच्या भावजीवनाचा वेध घेत त्यांची मानसिक कोंडी ही कादंबरी आपल्या समोर उकलून दाखवते.

" भावीण " ही कादंबरी कादंबरी प्रकाराच्या कोणत्याही मापदंडाने मोजायची झाली तर ती प्रादेशिक कादंबरी आहे हे निश्चित. गोमंतकाचा प्रदेश आणि त्या प्रदेशात आढळणारी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परंपरा कथानकाच्या आवश्यकतेनुसार या कादंबरीभर पूर्णपणे विखुरलेली आहे. " भावीण " या नावाने ओळखली जाणारी देवदासींची विशिष्ट संस्था फक्त गोमंतकातच आढळते. या देवदासींच्या वर्गात समाविष्ट होणारी नायिका, तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण तिची कर्तव्ये,

देवळांचे विशिष्ट धर्माधर्मविषयक दृढ समजुतींनी भरलेले वातावरण, रुढी परंपरा, लोकमानसाची घडण, विशिष्ट निसर्ग व त्या परिसरात वावरणा-या माणसांचे रीतिरिवाज, पोशाख, बोलणे-चालणे, या सर्व गोष्टींशी गोमंतक हा विशिष्ट प्रदेश निगडित आहे. हा प्रदेश या कादंबरीतून काढून टाकला तर ही कादंबरी सिध्दच होणार नाही. इतके या प्रदेशाचे कादंबरीतल्या आशयाशी अभिन्नत्व, एकजीवित्व आहे. (13)

या कादंबरीची भाषा एकाच वेळी भावना आणि वेदना व्यक्त करणारी पण काव्यात्म आहे. गोमंतकातील जीवनजाणिवेशी निगडित सर्व बारकावे हळुवार शब्दातून प्रगट झाले आहेत. ही कादंबरी भाविणीच्या जीवनाशी संबंधित असूनही तिच्या भाषेला अतिरेकी शृंगाराने जराही स्पर्श केलेला नाही हे महत्वाचे आहे. कादंबरीची नायिका शेवंती भावीण सात्विक वृत्तीची आहे. तिच्याच प्रमाणे भाषाही प्रसन्न, सात्विक आणि सोज्वळ आहे. अप्सरेचे सौंदर्य लाभलेल्या शेवंतीचे वर्णन करताना बोरकर म्हणतात, " कांचनाच्या पुतळीसारखी ती झळाळत होती. तिच्या अंगावर कोणताच अलंकार नव्हता. स्नात केसाखालच्या तिच्या कानाच्या उघडया तांबूस पाळया कुडयांच्या अभावी जास्तच सुंदर दिसत होत्या. आणि अंगुळी वर नेल्यामुळे खाली उतरलेल्या तांबडया काचेच्या बारीक बांगडया तिच्या हाताच्या नाजुकपणाची शोभा वाढवित होत्या, " अतिशय चित्रदर्शी असे तिचे वर्णन त्यांनी केले आहे तर गोव्याच्या निसर्गसौंदर्याचे अतिशय लोभसवाणे मूर्तिमंत चित्रण वाचताना बोरकरांचा काव्यात्म गद्याचाच अनोखा प्रकार आपल्याला जाणवत जातो आणि प्रत्यक्ष गोमंतकच वाचकांच्या नजरेसमोर उभा राहतो. " पन्नास पावलांच्या अंतरावर लहानसेच पण स्वच्छ असे मंगळुरी कौलांचे चुनेरी घर होते. त्याच्यासमोर शेणाने सारवलेले सुंदर अंगण होते. एका कोप-याला पांढ-या चाफयाचे झाड फुलून निघाले होते. अँगणाच्या पुढच्या दोन्ही कोप-यात गोंडेदार शेंडयाची दोन पोफळीची झाडे डुलत होती आणि चौथ्या कोप-यात एक हिरवीगार विलायती वेल तारांच्या चौकटीतून कुसर विणीत कौलारावर आपला हिरवागार पसारा मांडून बसली होती. अंगणाच्या मधोमध चुनेरी वृंदावन होते आणि तांबडया मातीच्या अष्टदळी कुंभातून तुळशीचे तरतरीत रोप कोवळया मंजि-या ढाळीत होते. " अशी काव्यात्म चित्रदर्शी शब्दकळा कादंबरीभर आहे.

गोमंतकात वापरले जाणारे शब्द या कादंबरीत चपखलपणे वापरले आहेत, त्यामुळे भाषेला एक वेगळेच वजन प्राप्त झाले आहे. दिवड, काचोळी, विस्तव सांदकून, चणाक, आगटयातले निखारे, वाडगा, घडावले, रायस यासारखे शब्द गोमंतकीय बोलीचे वेगळे वैशिष्टय दाखवितात. कौल लावणे, हुंदका येणे यासारखे शब्द प्रयोग गोव्याच्या खास जीवन पध्दतीची समज वाचकांना सहज देतात. गोव्यात सणवार, उत्सव होतात. अनेक देवदेवतांची मंदिरे गोव्यात सर्वत्र आढळतात. त्या अनुषंगाने श्रावण शुक्ल पौर्णिमा, नवचंडी, फुलविडयाची पंचमी, पालखी, पेणे, दिंडी, दीपमाळा, गर्भागार,

मंत्रघोष, जाईबकुळीचे स्वर या सारखे आलेले शब्द गोमंतकातील जीवनाचे, भावीण धर्माचे अनेक बारीक तपशील पुरवितात. त्यामुळे कादंबरीला एक वेगळाच उठाव प्राप्त झाला आहे.

गोमंतकाच्या भूमीतील एक आगळे-वेगळे वैशिष्टय ही कादंबरी वाचताना आपल्या नजरेसमोर चटकन उभे राहते. डॉक्टरने औषध अथवा दुकानदाराने वस्तू द्यावी इतक्या सहजपणे शेवंती हृषीला शरीरसुख देते. हे जीवनाचे तत्व वेगळे आहे. तिच्या कृत्याबद्दल विशेष वादविवाद चर्चाही होत नाहीत. कोणी संतापत नाही, वैतागून जात नाही. एखाद्या पुरुषाने एखाद्या स्त्रीला " ठेवली " या कल्पनेने हा समाज सभ्यासभ्याचे सव्यापसव्य करीत नाही. उतार वयातील अंताशेठ व फुलवंती ही दोघेही प्रत्यक्षात संबंध नसताना ते आहेत अशा अफवेला खतपाणी घालतात. फ्रेडची पत्रे व पैसे शेवंती परत करते. हे फुलवंतीला आवडत नाही. तारुण्यवयसाकाळी शक्य तेवढे सुख उपभोगावे व वृध्दपणाची तरतूद करावी हे तिचे तत्वज्ञान आहे. बामणाचे रक्त तुला व मला छळीत असल्याची तिची तक्रार आहे. हे सारे जीवन महाराष्ट्राच्या जीवनाहून वेगळे आहे. असल्या चमत्कारिक तत्वज्ञानाचे अस्तित्व अन्य महाराष्ट्रात नाही. '14 हेच या कादंबरीतील जीवन जाणिवेचे " प्रादेशिक " पातळीवरील महत्वाचे वैशिष्टय जाणवते.

× संदर्भ ×


| | |
|---|---|
| 1) सुर्वे, भा.ग. | ' महाबळेश्वर साहित्य संमेलन पुरवणी ' (1970), पृ. 3. |
| 2) फडके, भालचंद्र | ' प्रदक्षिणा ', आवृत्ती - 6, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1976, पृ. 246. |
| 3) बोरकर, बा.भ. | ' भावीण ', (प्रस्तावना), आवृत्ती - 3, बांदोडकर पब्लिशिंग हाऊस, 1986, पृ. 1. |
| 4) जोग, ल.ग. | ' कादंबरी ', आवृत्ती - 1, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, 1966, पृ. 37. |
| 5) तत्रैव | पृष्ठे - 108, 109. |
| 6) सप्रे, अविनाश | ' प्रदक्षिणा - खंड - 2 ', आवृत्ती - 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 1991, पृ. 118. |
| 7) बापट, प्र.वा., व गोडबोले, ना.वा. | ' मराठी कादंबरी तंत्र व विकास ' आवृत्ती - 3, व्हीनस प्रकाशन पुणे 1973, पृ. 366. |
| 8) देशपांडे, कुसुमावती | ' मराठी कादंबरी : पहिले शतक ', आवृत्ती - 2, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन - 1975, पृ. 336. |
| 9) देशपांडे, अ.ना. | ' आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग - 2 ', आवृत्ती - 1, व्हीनस प्रकाशन पुणे, 1958, पृ. 228. |
| 10) सुर्वे, भा.ग. | ' महाबळेश्वर साहित्य संमेलन पुरवणी ' (1970), पृ. 3. |

11) फडके, भालचंद्र — ' मराठी कादंबरीची वाटचाल ', ललित, (जाने. 1972), पृ. 64.

12) कुलकर्णी, गो.म. — ' प्रादेशिकता आणि साहित्य ', साहित्य सूची दिवाळी अंक, (1985), पृ. 103.

13) मणेरकर, प्रभा — ' भारतीय साहित्याचे निर्माते : बा.भ. बोरकर ', आवृत्ती - 1, साहित्य अकादमी - 1990, पृ. 75.

14) जोग, ल.ग. — ' कादंबरी ', आवृत्ती - 1, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे - 1966, पृ. 112.